Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… **Date: 19/03/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## चित्रपट संगीतकार शंकर विष्णू चांदेकर

शंकर विष्णू तथा दादा चांदेकर हे एक मराठी संगीत दिग्दर्शक होते. त्यांचा जन्म १९ मार्च १८९७ रोजी कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील मिरजेच्या राजेसाहेबांकडे संगीतकार म्हणून नोकरीस होते. लहानपणीच ते वडिलांकडून पेटीवादन शिकले. पुढे दादांनी मिरजेतील प्रसिद्ध संगीतशिक्षक नीलकंठबुवा जंगम यांचे शिष्यत्व पत्करले. १९१४ मध्ये त्यांनी किर्लोस्कर कंपनीत प्रवेश केला. त्यानंतर बलवंत संगीत मंडळी, विश्वनाथ संगीत मंडळी, इत्यादी नाट्यसंस्थांत त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. ते १५ वर्षे नाट्यसृष्टीत होते.

१९३५ साली भालजी पेंढारकर दिग्दर्शित कालियामर्दन या चित्रपटात संगीत दिग्दर्शक म्हणून त्यांना पहिली संधी मिळाली. १९३७ मधील प्रिन्स शिवाजी प्रॉडक्शन्सच्या 'स्वराज्य सीमेवर' या यशस्वी ऐतिहासिक चित्रपटाचे संगीतही दादांचेच होते; परंतु त्यांचे खरे नाव झाले ते ब्रह्मचारी या अत्यंत यशस्वी चित्रपटामुळे. या चित्रपटातील दादांची सर्व गाणी लोकप्रिय झाली. 'यमुनाजळी खेळू खेळ कन्हैया' या मीनाक्षीने गायलेल्या गाण्याने तर त्या काळी (१९३८) चित्रपट-रसिकांना वेडच लावले होते. यानंतर दादांनी लपंडाव, अर्धांगी, मोरूची मावशी, ब्रह्मघोटाळा, छाया, अमृत, सासर-माहेर इत्यादी चाळीसहून अधिक चित्रपटांना संगीत दिले. त्यांत बहुतेक मराठी व काही हिंदी चित्रपटही होते. 'नटली चैत्राची नवलाई' हे 'पहिली मंगळागौर'मधील लता मंगेशकरांनी गायलेले त्यांचे आणखी एक लोकप्रिय गीत; तर जयमल्हार (१९४७) या मराठी लावणीप्रधान चित्रपटातील संगीतही दादा चांदेकरांचेच होते. ते उत्तम हार्मोनियमवादक होते. पुणे आकाशवाणीवर संगीत दिग्दर्शक आणि संगीत परीक्षक म्हणून बरेच दिवस त्यांनी काम केले. दादा चांदेकर यांचे २७ जानेवारी १९७६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Mar 19, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401